दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक – ६६ रविवार दि.१५ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-7th Issue-66 Sunday, Dt.15 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# लोकशाहीचा समतोल की सत्तेचा नवा हिशेब? डिलिमिटेशनच्या वादात जनतेचे हित हरवू नये.!




## मतदार महत्त्वाचा की सत्तेचे गणित.?

लोकशाहीत निवडणुका जिंकणे हे राजकीय पक्षांचे उद्दिष्ट असू शकते; मात्र लोकशाही व्यवस्था टिकवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. कोणत्याही राज्याचा राजकीय आवाज दाबला जाणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

## राजकीय स्वार्थाच्या चौकटीतून बाहेर पडण्याची वेळ..

प्रत्येक नागरिकाला समान राजकीय प्रतिष्ठा, प्रत्येक राज्याला न्याय्य प्रतिनिधित्व आणि प्रत्येक प्रदेशाला आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकीय स्वार्थापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावे.

## लोकशाहीचा विजय झाला पाहिजे.!

सत्तेचे गणित बदलत राहील, सरकारे येतील–जातील मात्र लोकशाहीवरील जनतेचा विश्वास टिकला पाहिजे. डिलिमिटेशनच्या प्रक्रियेत राजकीय वर्चस्वापेक्षा घटनात्मक मूल्ये, जनहित आणि राष्ट्रीय एकात्मता महत्त्वाची ठरली पाहिजेत. कारण राजकीय विजयापेक्षा लोकशाहीचा विजय मोठा असतो.!

## केवळ मतदारसंख्या वाढवून न्याय मिळेल..?

बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा आवाज लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून प्रभावीपणे संसद आणि विधानसभेत पोहोचणे महत्त्वाचे आहे. केवळ मतदारसंख्या वाढवून सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळणार नाही.

बीड / वैभव स्वामी

भारतीय लोकशाहीत मतदारसंघांची पुनर्रचना अर्थात डिलिमिटेशन हा केवळ राजकीय विषय नसून देशातील प्रत्येक नागरिकाच्या प्रतिनिधित्वाशी जोडलेला घटनात्मक मुद्दा आहे. मात्र, या विषयावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरू असलेला संघर्ष पाहता लोकशाहीचा समतोल राखला जाणार की राजकीय वर्चस्वाचे नवे गणित मांडले जाणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

डिलिमिटेशनच्या समर्थनार्थ सत्ताधारी पक्ष लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचे सांगत आहे. वाढती मतदारसंख्या, मोठे मतदारसंघ आणि लोकप्रतिनिधींवरील कामाचा ताण लक्षात घेता पुनर्रचना आवश्यक असल्याचा त्यांचा युक्तिवाद आहे. दुसरीकडे, लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या दक्षिण भारतीय राज्यांचे संसदीय प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती विरोधक व्यक्त करीत आहेत. त्यामुळे हा वाद केवळ उत्तर विरुद्ध दक्षिण असा नसून देशाच्या संघराज्य व्यवस्थेच्या समतोलाशी संबंधित आहे.भारतीय संविधानातील कलम ८२ आणि १७० मध्ये मतदारसंघ पुनर्रचनेची तरतूद आहे. १९७६ मधील ४२ व्या घटनादुरुस्तीने लोकसभेतील राज्यनिहाय जागांचे वाटप १९७१ च्या जनगणनेनुसार स्थिर ठेवण्यात आले. २००१ मधील ८४ व्या घटनादुरुस्तीने ही स्थगिती २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध होईपर्यंत वाढवली. त्यामुळे २०२६ सुरू झाले म्हणजे पुनर्रचना आपोआप लागू होते, असा अर्थ होत नाही.

२०२३ मधील १०६ व्या घटनादुरुस्तीने महिला आरक्षणाची तरतूद केली असून त्याची अंमलबजावणी जनगणना आणि परिसीमन प्रक्रियेशी जोडण्यात आली आहे. मात्र, महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेतील मतभेद यांची राजकीय सरमिसळ होऊ नये.

एप्रिल २०२६ मध्ये केंद्र सरकारने लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागा वाढवून ८१६ करण्यासह संबंधित घटनादुरुस्ती विधेयके संसदेत मांडली होती. दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व प्रमाण कायम राहील, अशी सरकारची भूमिका होती. मात्र, विरोधकांनी जागावाटपाच्या निकषांवर प्रश्न उपस्थित केले. आवश्यक घटनात्मक बहुमत न मिळाल्याने १७ एप्रिल २०२६ रोजी ही विधेयके पुढे जाऊ शकली नाहीत. या घडामोडींमुळे डिलिमिटेशनच्या विषयावर व्यापक सहमतीची गरज अधोरेखित झाली.

**महाराष्ट्राच्या दृष्टीनेही महत्त्वाचा विषय..**

महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण या विभागांच्या भौगोलिक व सामाजिक समस्या वेगवेगळ्या आहेत. विशेषतः मराठवाड्यातील दुष्काळ, पाणीटंचाई, सिंचनाचा अनुशेष, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न लक्षात घेता मतदारसंघ पुनर्रचनेत केवळ लोकसंख्या हाच निकष न ठेवता भौगोलिक क्षेत्र, दुर्गम भाग आणि सामाजिक परिस्थितीचाही विचार होणे आवश्यक आहे.

**सत्ताधाऱ्यांनी पारदर्शकता ठेवावी, विरोधकांनी पर्याय द्यावा.!**

डिलिमिटेशनची प्रक्रिया कोणत्या निकषांवर होणार, राज्यनिहाय जागांचे वाटप कसे होणार आणि लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी राज्यांचे प्रतिनिधित्व कसे सुरक्षित राहणार, याबाबत सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे. परिसीमन आयोगाची स्वायत्तता आणि प्रक्रियेची पारदर्शकता अबाधित राहिली पाहिजे.

त्याचवेळी विरोधकांनीही केवळ विरोधासाठी विरोध न करता लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्याच्या प्रश्नावर व्यवहार्य पर्याय मांडला पाहिजे. अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांतील नागरिकांचा प्रतिनिधित्वाचा अधिकार नाकारता येणार नाही आणि लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी राज्यांवर अन्यायही होता कामा नये.

# ना विलंब, ना प्रतीक्षा, रुग्णाचा फोन येताच आ.सुरेश धस यांची तात्काळ मदत सेवा

## मुख्यमंत्री सहायता निधीतून दोन रुग्णांना प्रत्येकी ५० हजारांची आर्थिक मदत



आष्टी – (एस.राजेंद्र लाड)

गंभीर आजार, महागडे उपचार आणि आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदतीचा आधार मिळावा, यासाठी लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांच्याकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. रुग्णाचा मदतीसाठी एक फोन येताच त्याची तत्काळ दखल घेऊन संबंधित आरोग्य सेवकांना सूचना देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे, अशी कार्यवाही त्यांच्या माध्यमातून केली जात आहे.

आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नातून आष्टी तालुक्यातील दोन गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. यामध्ये कारखेल येथील नारायण खुडे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ५० हजार रुपये, तर दौलावडगाव येथील मनकर्णा जाधव यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या या दोन्ही कुटुंबांना उपचारासाठी मोठा आधार मिळाला आहे.

विशेष म्हणजे, रुग्णांच्या मदतीसाठी केवळ सूचना देऊन न थांबता संबंधित यंत्रणेमार्फत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, प्रस्ताव तयार करणे आणि शासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करणे, ही प्रक्रिया तत्परतेने राबविली जात आहे. यासाठी अमर वाळके, विकास साळवे, विनोद वाघ, दत्ता हुले आणि शरद रेडेकर हे आमदार सुरेश धस यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी तत्परतेने कार्यरत आहेत.

रुग्णाचा एक फोन, तत्काळ दखल आणि मदतीसाठी सुरू होणारी कार्यवाही, या पद्धतीने आष्टी मतदारसंघातील गरजू रुग्णांपर्यंत शासकीय मदत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. आजारपणामुळे आधीच संकटात सापडलेल्या कुटुंबांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळत आहे.

संकटाच्या काळात रुग्णांना वेळेवर मदतीचा हात मिळणे महत्त्वाचे असते. त्यामुळे ना विलंब, ना प्रतीक्षा, तर रुग्णांच्या मदतीसाठी तत्पर कार्यवाही, अशा पद्धतीने आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ मिळत आहे.

# स्पर्धा २०२६ चे बीड येथे उद्यापासून आयोजन

## पाच पोलीस घटकांतील सुमारे ८०० खेळाडूंचा सहभाग

बीड प्रतिनिधी

पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या शारीरिक क्षमता, क्रीडाकौशल्य, खिलाडूवृत्ती व सांघिक भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ३७ वी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ चे आयोजन बीड येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचा शुभारंभ दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार असून स्पर्धा दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे. या स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, बीड, धाराशिव, जालना या जिल्ह्यांसह छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस आयुक्तालय अशा एकूण पाच पोलीस घटकांचे संघ सहभागी होणार असून अंदाजे ८०० पोलीस अधिकारी व अंमलदार खेळाडू आपले क्रीडाकौशल्य सादर करणार आहेत.

या स्पर्धेमध्ये सांघिक व वैयक्तिक अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये हॉकी, फुटबॉल, हँडबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो व कबड्डी या खेळांचा समावेश असून वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये ॲथलेटिक्स, क्रॉसकंट्री, जलतरण, डायव्हिंग, कुस्ती, बॉक्सिंग, ज्युदो, वेटलिफ्टिंग, तायक्वांदो, वुशू (सॅशू), वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग व बॉडीबिल्डिंग या खेळांच्या स्पर्धा होणार आहेत. यामध्ये पुरुष व महिला खेळाडूंचा सहभाग राहणार आहे. स्पर्धेतील बहुतांश सामने बीड पोलीस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर पार पडणार असून एका क्रीडा प्रकाराची स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे.

या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन व विविध कार्यक्रमांसाठी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र श्री. वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस आयुक्त तसेच छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील सहभागी पोलीस घटकांचे पोलीस अधीक्षक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांनी या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या असून सर्व सहभागी खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून पोलीस दलाचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.या स्पर्धेच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आपले क्रीडागुण व कौशल्य प्रदर्शित करण्याची संधी मिळणार असून त्यांच्यात परस्पर समन्वय, बंधुभाव, खिलाडुवृत्ती व संघभावना अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बीड पोलीस दलाच्या वतीने आवश्यक नियोजन व तयारी करण्यात आली असून सर्व सहभागी खेळाडूंचे बीड जिल्ह्यात स्वागत करण्यात येत आहे.

# लोकप्रतिनिधींची उदासीनता :: घाटनांदुरकर आणि परिसरातील लोकं मात्र रेल्वे थांबत नसल्याने कमालीचे त्रस्त...!

## बाहेरची गावं दत्तक घेण्यापेक्षा मतदारसंघातल्या तुमच्या घाटनांदुरला रेल्वे थांबण्याची सोय करून द्या ::: खासदार तर असून नसल्यासारखाच आहे... भाऊ–ताई तुम्ही तरी लक्ष द्या –– ग्रामस्थांची नामदार–आमदार बहिण–भावाला आर्त हाक.....!!

### भाऊ–बहीण' सत्तेत मग सर्वसामान्यांचे 'वेटींग' का...? आज स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब असते तर कधीच घाटनांदुर रेल्वे थांबा सुरळीत झाला असता...!

बीडच्या रेल्वे स्वप्नासाठी अनेकांनी आयुष्यभर संघर्ष केला. आज ना.पंकजा मुंडे आणि आ.धनंजय मुंडे हे दोघेही राज्याच्या आणि खा.बजरंग सोनवणे देशाच्या राजकारणात महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. बहिण–भाऊ दोघेही सत्तेच्या वर्तुळात वजन राखून आहेत. तर निवडून आल्यापासून अगदी निष्क्रिय खासदार म्हणून देशाच्या सर्वोच्च सभागृहात परिचित झालेले खासदार बजरंग सोनवणे तर कोणत्याच कामाचे नाहीत. सरकार आणि सभागृहात स्वतःला मातब्बर म्हणून घेणारे हे तिघेही घाटनांदुर रेल्वे थांबा प्रश्न आणि उड्डाणपुलाच्या बाबतीत मात्र सपशेल अपयशी ठरताना दिसून येत आहेत. जिल्ह्यातील छोट्या स्टेशनवरील रेल्वे थांबे आणि थेट रेल्वे कनेक्टिव्हिटीसाठी नागरिकांना आजही आंदोलनाचे 'रुळ' धरावे लागत आहेत. वेळप्रसंगी रुळावरती झोपावे लागत आहे. तरीही यांच्यासाठी अगदी छोटा असणारा आणि नागरिकांसाठी अत्यंत मोठा असणारा हा प्रश्न काही केल्या सुटायला तयार नाही.




अंबाजोगाई / सुनील सीरसाट––

अंबाजोगाई–परळी–धर्मापुरी–किनगाव–पानगाव–रेणापूर या प्रमुख शहरांना–गावांना मध्यकेंद्रित जोडलेले घाटनांदुर हे एक छोटेसे–मध्यम रेल्वेस्थानक असून, गेल्या अनेक वर्षांपासून येथून मोठ्या प्रमाणात रेल्वे–रेल्वे मालगाड्यांची ये–जा होते. परंतु अलीकडच्या काळात एक दोन–तीन सर्वसाधारण गाड्या सोडता इतर कोणतीही रेल्वे घाटनांदुर रेल्वेस्थानकात थांबत नाही.

कोरोना काळात बंद झालेले गाड्यांचे थांबे आजही बंदच असल्याने विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, नौकरदारांचे हाल–बेहाल होत आहेत. एकीकडे नेतेमंडळी विकासाच्या गप्पा मारत दुसऱ्या जिल्ह्यातील गावे दत्तक घेत आहेत, तर दुसरीकडे स्वतःच्याच मतदारसंघातील घाटनांदुर रेल्वेस्थानकावर कोरोना काळापासून बंद झालेला रेल्वे थांबा गेली अनेक वर्षांनंतरही सुरू झालेला नाही असा संतप्त सवाल घाटनांदुर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे. कोरोना काळात बंद झालेला रेल्वे थांबा पुन्हा सुरू होणार का...? हा संतप्त सवाल घाटनांदुर व परिसरातील सर्वसामान्य नागरिकांनी थेट मंत्री ना.पंकजा मुंडे परळी मतदारसंघाचे आ.माजी मंत्री धनंजय मुंडे, खा.बजरंग सोनवणे, माजी खा.डॉ.प्रीतम मुंडे, माजी आ.संजय दौंड या सर्व लोकप्रतिनिधींना विचारला आहे.

''कोरोना गेला, गाड्या सुटल्या... पण आमचा थांबा कुठे हरवला...?'' हा विशेष सवालही विशेष करून मुंडे भावंडांना विचारला गेला आहे. कोरोनाची महामारी आली, लॉकडाऊन लागला आणि देशाचे चाक थांबले. पुढे संकट टळले. 'अच्छे दिन' चे दावे झाले, एक्सप्रेस गाड्या रुळावरून धावू लागल्या. इतरत्र तर अगदी हायस्पीड वंदेभारत ही आल्या. पण ४०–४५ खेड्यांच्या लोकांचा कारभार–व्यवहार, उदरनिर्वाह सांभाळणाऱ्या घाटनांदूरचा अगदी सर्वसामान्यांच्या हक्काचा जो रेल्वे थांबा कोरोना काळात बंद झाला.तो मात्र अद्यापही 'क्वारंटाईन' मधून बाहेर आलेला नाही. याच पार्श्वभूमीवर घाटनांदुर आणि सभोवतालच्या परिसरातील त्रस्त जनतेने आता थेट मंत्री महोदया ना.पंकजा मुंडे आणि आ.धनंजय मुंडे यांना सवाल विचारला आहे की , निवडणुकांच्या काळात तुमच्या गाड्या अगदी वेळेवर धावतात. एकमेकांच्या सोयीने तुम्ही आमदार–मंत्री होतात. तुमचं सगळं सुरळीत होतं....! मग आमच्या हक्काची रेल्वे आणि तिचा थांबा कधी सुरू होणार....??

## सिग्नल

### कधी मिळणार...?

आता अंतर्गत राजकीय समीकरणांमधून वेळ काढून या सर्व नेत्यांनी रेल्वे मंत्रालयाकडे सामूहिक ताकद लावावी आणि कोरोना काळात बंद पडलेले घाटनांदुर स्थानकाचे सर्व थांबे पुन्हा बहाल करावेत हीच जनतेची मनोभावे अपेक्षा आहे.

आतातरी आमचा वैताग आणि आमची गरज पाहून ना.पंकजा मुंडे आणि आ.धनंजय मुंडे तरी दिल्ली–मुंबईकडून या रेल्वे थांब्याला 'ग्रीन सिग्नल' मिळवून देतात की, जनतेला यापुढेही केवळ आश्वासनांच्या 'प्लॅटफॉर्म' वरच ताटकळत ठेवतात याकडेच घाटनांदुर आणि सभोवतालच्या परिसरातील वेगवेगळ्या गावच्या नागरिकांचे अर्थात सर्वांचे लक्ष लागले आहे....!

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# संपादकीय

**अग्रलेख**

## राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाच्या चर्चेत कार्यकर्त्यांचा स्वाभिमान, नेतृत्वाची विश्वासार्हता आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा हरवू नये.!

बीड -

राजकारणात पक्ष फुटतात, एकत्र येतात आणि पुन्हा नवी समीकरणे तयार होतात. मात्र, या सगळ्या घडामोडींमध्ये विचारधारा, कार्यकर्त्यांची निष्ठा आणि जनतेचा विश्वास टिकतो का, हा खरा प्रश्न आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेने महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा उत्सुकता निर्माण केली आहे. हे एकत्रीकरण राज्याच्या हितासाठी होणार की सत्तेच्या नव्या गणितासाठी, याचे उत्तर नेतृत्वाला द्यावे लागणार आहे.

१९९९ मध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान निर्माण केले. मात्र, २०२३ मधील फुटीनंतर पक्षाचे दोन गट झाले. या विभाजनामुळे केवळ राजकीय समीकरणे बदलली नाहीत, तर वर्षानुवर्षे एकत्र काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्येही संभ्रम निर्माण झाला. आता पुन्हा एकत्रीकरणाची चर्चा सुरू झाल्याने राजकीय वर्तुळाचे लक्ष या घडामोडींकडे लागले आहे.

एका बाजूला भाजपप्रणीत महायुतीसोबत असलेला गट, तर दुसरीकडे महाविकास आघाडीशी संबंधित गट, अशी सध्याची राजकीय परिस्थिती आहे. दोन्ही गट एकत्र आले तर पुढील राजकीय भूमिका काय असेल.? महायुतीसोबत राहायचे, विरोधी आघाडीत जायचे की स्वतंत्र राजकीय दिशा स्वीकारायची ? हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

१३ नोव्हेंबर रोजी छगन भुजबळ यांनी विलीनीकरणाची चर्चा प्राथमिक स्तरावर असल्याचे सांगितले. तर १४ नोव्हेंबर रोजी सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर विलीनीकरणाच्या चर्चेला आपल्या बाजूने पूर्णविराम मिळाल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे विलीनीकरणाबाबत अद्याप निश्चित निर्णय झालेला नाही.

विलीनीकरण झाल्यास पक्षाचे नेतृत्व कोण करणार, संघटनेत कोणाला स्थान मिळणार आणि विद्यमान आमदार, खासदार व पदाधिकाऱ्यांचे भवितव्य काय असेल, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. मात्र, या सत्ताकारणात सामान्य कार्यकर्ता दुर्लक्षित होता कामा नये. वर्षानुवर्षे पक्षासाठी संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच निर्णय झाला पाहिजे.

शरद पवार यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव आणि संघटनात्मक कौशल्य महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे आहे. त्याचवेळी नव्या पिढीला नेतृत्वाची संधी आणि निर्णयप्रक्रियेत स्थान मिळणेही आवश्यक आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी, सुनेत्रा पवार यांच्यापुढील संघटनात्मक आव्हाने आणि दोन्ही गटांतील विश्वासाचा प्रश्न संवेदनशीलतेने हाताळला पाहिजे.

शेतकरी, बेरोजगारी, महागाई, दुष्काळ, सिंचन आणि ग्रामीण विकास यांसारखे प्रश्न महाराष्ट्रासमोर आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आले, तर त्याचा फायदा केवळ निवडणुकीतील जागांच्या गणितापुरता मर्यादित राहू नये. जनतेच्या प्रश्नांवर प्रभावी भूमिका घेणारा सक्षम राजकीय पर्याय निर्माण झाला पाहिजे.

सत्तेसाठी राजकीय समीकरणे बदलणे ही आजच्या राजकारणातील वाढती प्रवृत्ती आहे. मात्र, विचारधारा आणि तत्त्वांना तिलांजली देऊन केलेले एकत्रीकरण कितपत टिकेल ? हा प्रश्न नेतृत्वाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. विलीनीकरण करायचे असेल तर त्यामागील उद्देश, राजकीय भूमिका आणि भविष्यातील दिशा स्पष्ट असली पाहिजे.

पक्षाची खरी ताकद आमदारांची संख्या, मंत्रिपदे किंवा सत्तेतील सहभागात नसते, तर ती कार्यकर्त्यांच्या निष्ठेत आणि जनतेच्या विश्वासात असते. त्यामुळे केवळ नेत्यांच्या हातमिळवणीचे फोटो काढून एकत्रीकरण यशस्वी होणार नाही. कार्यकर्त्यांच्या मनातील संभ्रम आणि जनतेच्या मनातील प्रश्न दूर करावे लागतील.कारण पक्षांचे विलीनीकरण राजकीय समझोत्यातून होऊ शकते; पण मनांचे आणि विश्वासाचे विलीनीकरण करण्यासाठी प्रामाणिकपणा, त्याग आणि विचारांची निष्ठा आवश्यक असते. राष्ट्रवादीच्या भवितव्याचा खरा फैसला याच कसोटीवर होणार आहे.!

# महात्मा जोतीराव फुले : सामाजिक क्रांतीचा विचार आणि परिवर्तनाचा अखंड वारसा

### द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त मंत्री छगन भुजबळ यांनी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून उलगडले महात्मा फुलेंचे जीवनकार्य

''विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना वित्त गेले...'' या विचारातून शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांनी भारतीय समाजाला सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. शिक्षण, समता, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्यायासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालक प्रणय जयश्री कैलास चव्हाण यांनी घेतलेल्या मुलाखतीत फुलेंचे सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचार उलगडले.

**शिवरायांची राज्यक्रांती, फुलेंची सामाजिक क्रांती**

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांती घडवली, तर महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक क्रांती घडवली, असे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. जातिभेद, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धेच्या विरोधात फुले दाम्पत्याने शिक्षणाला परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविले.

**स्त्रीशिक्षण आणि सामाजिक समतेचा लढा**

१८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू करून महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. समाजाचा तीव्र विरोध, सावित्रीबाईंवर फेकण्यात आलेले शेण आणि चिखल यांची पर्वा न करता त्यांनी शिक्षणकार्य सुरू ठेवले.

विधवा महिलांसाठी आणि बालहत्यांना प्रतिबंध करण्यासाठी त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या नागरिकांसाठी घरातील पाण्याचा हौद खुला केला. यशवंत यांना दत्तक घेऊन त्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या कृतीतून मानवता आणि समतेचा आदर्श दिसून येतो.

**साहित्य, सत्यशोधक समाज आणि शेतकरी कल्याण**




'गुलामगिरी' आणि 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथांतून त्यांनी सामाजिक विषमता, शोषण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर परखड भाष्य केले. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेतून जातीय भेदभावाला विरोध करून समता, विवेक आणि मानवतेचा विचार रुजविला. सर्वांना समान शिक्षण मिळावे आणि वयाच्या १४ वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे असावे, अशी मागणी त्यांनी ब्रिटिश सत्तेकडे केली होती. आज ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना शिक्षणाचा कायदेशीर अधिकार मिळाला आहे. ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष आहे.

**दुष्काळग्रस्त आणि शेतकऱ्यांविषयी आस्था**

शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नांसाठी महात्मा फुले यांनी सातत्याने आवाज उठविला. दुष्काळाच्या काळात गरजूंसाठी अन्नछत्रे आणि मदतकार्य राबवून सामाजिक बांधिलकी जपली.

मंत्री छगन भुजबळ यांनी मुलाखतीत सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करत शेतकऱ्यांना आर्थिक मदत, बियाणे, कर्जमाफी, पाणी व्यवस्थापन, हमीभाव आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या उपाययोजनांची माहिती दिली. बेकायदेशीर सावकारी रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याची शासनाची भूमिकाही स्पष्ट केली.

**फुलेंचे विचार हीच परिवर्तनाची प्रेरणा**

शिक्षण, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, शेतकरी कल्याण आणि अंधश्रद्धा निर्मूलन या विषयांवर महात्मा फुले यांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची प्रेरणा दिली, तर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समताधिष्ठित समाजनिर्मितीचा मार्ग दाखविला.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, समता आणि मानवतेची मूल्ये आचरणात आणणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**शब्दांकन**

**सुरेश पाटील**

**सहायक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

**संदर्भ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातील मंत्री छगन भुजबळ यांची विशेष मुलाखत.**

**प्रसारण दिनांक : १० नोव्हेंबर २०२६**
**प्रसारण माध्यम : दूरदर्शन सह्याद्री वाहिनी.**

# सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत इंग्रजांना आव्हान देणारे आदिवासी क्रांतिकारक राघोजी भांगरे.! १८५७ च्या उठावापूर्वीच ब्रिटिशांविरुद्ध उभारला सशस्त्र लढा

## आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांच्याकडून शौर्याचा गौरव

लातूर प्रतिनिधी

राघोजी रामजी भांगरे हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य आदिवासी क्रांतिकारक होते. १८५७ च्या उठावापूर्वीच त्यांनी ब्रिटिश सत्ता आणि जुलमी सावकारांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा प्रेरणादायी असल्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी नमूद केले.

राघोजी भांगरे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १८०५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील देवगाव येथे महादेव कोळी आदिवासी कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी भांगरे हे शूर योद्धे होते.

१८२१ मध्ये रतनगडावरील ब्रिटिशांविरुद्धच्या बंडात राघोजी वयाच्या सोळाव्या वर्षी वडिलांसोबत सहभागी झाले. या संघर्षानंतर त्यांच्या वडिलांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

वडिलांचा वारसा पुढे नेत राघोजी यांनी बंधू बापूजी भांगरे यांच्या मदतीने महादेव कोळी आणि भिल्ल तरुणांना संघटित केले. १८३८ मध्ये रतनगड



परिसरात ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला. अकोले, जुन्नर, नाशिक, ठाणे, पुणे आणि सातारा परिसरात त्यांनी इंग्रज व सावकारांविरोधात गनिमी काव्याने लढा दिला. सावकारांची कर्जाची कागदपत्रे जाळून गरिबांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

१८४४-४५ मध्ये जुन्नर, आंबेगाव, खेड आणि नाशिक परिसरात त्यांनी ब्रिटिश ठाण्यांवर हल्ले केले. १८४८ मध्ये पंढरपूर येथे भिल्ल सरदारांची भेट घेऊन आदिवासी समाजाला एकत्रित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

विश्वासघाताने अटक, फाशीची शिक्षा

१८४८ मध्ये पंढरपूर येथे ब्रिटिशांनी राघोजी भांगरे यांना विश्वासघाताने अटक केली. ठाणे न्यायालयातील खटल्यानंतर २ मे १८४८ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृहात त्यांना फाशी देण्यात आली. त्यांची समाधी शहापूर तालुक्यातील उंबरमाळी (उंभ्रई) येथे आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरापूर्वीच ब्रिटिशांविरुद्ध लढा उभारणाऱ्या राघोजी भांगरे यांचे शौर्य, त्याग आणि आदिवासी समाजाच्या हक्कांसाठीचे योगदान इतिहासात सदैव प्रेरणादायी राहील.

# भगवान बिरसा मुंडा जयंती व जनजातीय गौरव दिन विशेष

## आदिवासी समाज : निसर्गाचा खरा रक्षक आणि जैवविविधतेचा संवर्धक.!

### पारंपरिक ज्ञानातून शाश्वत विकासाचा मार्ग

सांगली प्रतिनिधी

मानव आणि निसर्ग यांचे नाते आदिवासी समाजाने पिढ्यानपिढ्या जपले आहे. जंगल हे आदिवासींसाठी केवळ उपजीविकेचे साधन नसून त्यांच्या संस्कृतीचे, श्रद्धेचे आणि अस्तित्वाचे केंद्र आहे. त्यामुळे आदिवासी समाजाला जल, जंगल आणि जमिनीचा खरा रक्षक मानले जाते. महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नंदुरबार, पालघर, नाशिक, ठाणे, पुणे, रायगड, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यांतील आदिवासी समुदाय आजही निसर्गाशी समन्वय साधून जीवन जगत आहेत. गोंड, माडिया, कोलाम आणि इतर जमातींचे जंगलाशी असलेले नाते विशेष महत्त्वाचे आहे.

**जंगल आणि जैवविविधतेचे संवर्धन**

आदिवासी समाज मोहफुले, तेंदूपाने, बांबू, हिरडा, बेहडा, आवळा, मध आणि औषधी वनस्पतींचा वापर निसर्गाचे संतुलन राखून करतो. जंगलातील आगी रोखणे, अवैध वृक्षतोड थांबवणे आणि वन्यजीवांचे संरक्षण यामध्ये ग्रामसभा व स्थानिक समुदायांची भूमिका महत्त्वाची आहे. देवराई आणि पवित्र वनक्षेत्रांच्या परंपरेतूनही जैवविविधतेचे संरक्षण केले जाते.

**पारंपरिक ज्ञानातून शाश्वत विकास**

मिश्र पीकपद्धती, स्थानिक बियाण्यांचे जतन, नैसर्गिक खतांचा वापर आणि पाणी व्यवस्थापन या पारंपरिक पद्धती पर्यावरण-पूरक विकासाला हातभार लावतात. औषधी वनस्पतींचे ज्ञान हा आदिवासी समाजाचा अमूल्य वारसा आहे. या ज्ञानाचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे.

**वनहक्क आणि आर्थिक सक्षमीकरण**

वनहक्क कायदा २००६ अंतर्गत आदिवासींना वैयक्तिक व सामुदायिक वनहक्कांची तरतूद आहे. ग्रामसभांच्या माध्यमातून वनसंपत्तीचे संरक्षण व व्यवस्थापन करता येते. मोहफुले, तेंदूपाने, बांबू, मध आणि इतर गौण वनोपजांना प्रक्रिया व बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास आदिवासी कुटुंबांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकते.

**भगवान बिरसा मुंडा यांचे विचार प्रेरणादायी**

हवामान बदल, जंगलातील वणवे, पाणीटंचाई आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्यांवर मात करण्यासाठी आदिवासींचे पारंपरिक ज्ञान महत्त्वाचे आहे. भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात स्वाभिमान, संघटन आणि भूमीवरील अधिकारांची जाणीव निर्माण केली. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन आदिवासी संस्कृती आणि निसर्गाचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

१५ नोव्हेंबर २०२६ रोजी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने गडचिरोली येथे आयोजित भगवान बिरसा मुंडा जयंती व जनजातीय गौरव दिवस राज्यस्तरीय कार्यक्रम आदिवासी संस्कृती, परंपरा आणि निसर्गसंवर्धनाच्या कार्याचा गौरव करणारा ठरणार आहे.

जंगल वाचले तर जीवन वाचेल आणि जैवविविधता टिकली तर पर्यावरण सुरक्षित राहील. आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान करून निसर्गसंवर्धनाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हीच जनजातीय गौरव दिनाची खरी शिकवण आहे.

**लेखिका :**
**श्रीमती रजनी गिरडकर**
**संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे.**

## केज येथील बस आगाराला मंजुरी द्यावी केज विकास संघर्ष समितीची परिवहन मंत्र्याकडे मागणी



केज/प्रतिनिधी

केज हे बीड जिल्याचे सर्वात जुने तालुक्याचे ठिकाण असून, सध्या हे शहर खामगांव - पंढरपुर व अहमदपुर अहिल्यानगर या दोन राष्ट्रीय महामार्गाच्या जोडणीवर आहे. त्यामुळे येथुन दररोज हजारो प्रवाशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ये-जा करीत आहेत. त्यामूळे प्रवाशांच्या सोईसाठी केज येथील बस आगाराला मंजुरी देण्याची मागणी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.केज शहरात बस आगारासाठी सध्या केज-बीड महामार्गा लगत साडे सात एकर हुन अधिक जागा आरक्षित केलेली आहे. ही जागा सध्या पडुन असल्याने स्थानिक लोकांच्या अतिक्रमणाने व्यापली जाऊ लागली आहे.या ठिकाणी तात्काळ बस आगार स्थापन करुन ते कार्यान्वीत करावे अशी मागणी समिती गेले अनेक वर्षापासुन करीत असुन सध्या या जागेवर बस आगार सेंटर सुरु करता येवु शकते.सध्याचे धारुर बस आगार केज साठी सोयीचे नाही त्यामुळे केज येथुन सुटणाऱ्या गाड्यांना केज धारूर हा पंधरा किलोमीटर चा प्रवास प्रवाशी संख्येविना आर्थिक दृष्या परवडणारा नाही.तरी केज येथील बस आगार मंजूर करण्यात यावे. अशी मागणी केज संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

या निवेदनावर प्रा. हनुमंत भोसले, रामहरी कोल्हे,नासेर मुंडे,व शेषराव घोरपडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी धनेगाव येथे घेतली सोनवणे परिवाराची सांत्वनपर भेट



केज/प्रतिनिधी

मांजरा प्रकल्प मच्छिमार सहकारी संस्था, धनेगावचे चेअरमन श्री.लक्ष्मण पांडूरंग सोनवणे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते. या दुःखद प्रसंगी केज विधानसभे चे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी सोनवणे परिवाराची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी सोनवणे परिवाराचे सांत्वन करून त्यांना धीर दिला.कै.लक्ष्मण सोनवणे यांनी मांजरा प्रकल्प मच्छिमार सहकारी संस्थेच्या माध्यमातून केलेल्या कार्याचा त्यांनी यावेळी उल्लेख केला.यावेळी माजी सरपंच सुहास गुजर, पत्रकार दत्तात्रय मुजमुले, दत्ता नरके, योगेश हंडीबाग, राजकुमार सोनवणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

दैनिक समर्थ राजयोग
राजधानी-राजधानी
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )
वेचक वृत्त
रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२६
Sunday, Dt. 15 November 2026


# राजकिशोर मोदी यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यापाऱ्यांच्या उपोषण स्थळी भेट देत उपोषणाला दिला जाहीर पाठिंबा

अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विरोधात गेली चार दिवसांपासून सुरू असलेले परवानाधारक व्यापाऱ्यांच्या उपोषणाला माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी भेट दिली. भेटीत उपोषण कर्त्या व्यापाऱ्यांशी चर्चा करून ते करत असलेल्या उपोषणाला आपला जाहीर पाठिंबा असल्याचे सांगितले. त्याचबरोबर परवानाधारक व्यापाऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी आपण सर्वतो-परी सहकार्य करू असेही आश्वासन राजकिशोर मोदी यांनी उपोषणाला बसलेल्या व्यापाऱ्यांना दिले.यावेळी मोदी यांच्यासोबत जेष्ठ व्यापारी प्रकाश सोळंकी, अंबाजोगाई नगर परिषदेचे गटनेते सय्यद ताहेर हे उपस्थित होते.

अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीने वितरित केलेल्या भूखंडाचे भाडे भरून घेऊन देखील इ वारंवार मागणी करून देखील सदर भूखंडावर त्या परवानाधारक व्यापाऱ्यांना बाजार समितीच्या वतीने व्यवसाय करण्यासाठी परवानगी मिळत नसल्याने परवानाधारक व्यापाऱ्यांनी गेली चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाईने २००२ मध्ये ठराव क्रमांक १२ अन्वये व्यापाऱ्यांना वाटप केलेल्या भूखंडांवर नोंदणीकृत भाडेपट्ट्यांच्या आधारे व्यवसाय सुरू करण्यास परवानगी द्यावी, तसेच भूखंडांवर बांधकाम करण्यास मान्यता द्यावी, अशी मागणी लायसन्स व परवानाधारक व्यापाऱ्यांनी केली आहे. वारंवार मागणी करूनही न्याय मिळत नसल्याने दि १२ नोव्हेंबर २०२६ पासून येथील व्यापाऱ्यांनी बाजार समिती कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा आजचा चौथा दिवस असून व्यापाऱ्यांच्या उपोषणात अनेक व्यापारी, संघटना सहभाग घेत आहेत. उपोषणाच्या ठिकाणी आज माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी भेट देत व्यापाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला




आहे. दुसरीकडे व्यापाऱ्यांच्या न्याय मागणीसाठी आमरण उपोषण सुरु असताना व्यापाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे दोन्ही संचालक गेले कुठे ? असा संतप्त सवाल उपोषणास बसलेल्या व्यापाऱ्यांनी केला आहे. या आमरण उपोषणात ७ जण व्यापारी सहभागी असून ३० ते ४० जण साखळी उपोषण करीत आहेत.

कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतीमालाच्या खरेदी - विक्रीसाठी तयार केलेल्या सुधारित विकास आराखड्यातील भूखंड २७ फेब्रुवारी २००२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक १२ नुसार परवानाधारक व्यापाऱ्यांना ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने वाटप केले होते. त्यानुसार बाजार समितीने व्यापाऱ्यांकडून रीतसर नोंदणीकृत भाडेपट्टे करून घेतले असून, आजपर्यंत वार्षिक भाडेही नियमितपणे स्वीकारले आहे. व्यापाऱ्यांनी आपल्या लायसन्सचे वेळो-वेळी नूतनीकरणही केले आहे. असे असताना स्वतः बाजार समितीने वाटप केलेल्या भूखंडांवर व्यवसाय सुरू करण्यास आणि बांधकाम करण्यास अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. या भूखंड वाटपाच्या निर्णयासंदर्भात यापूर्वी विविध न्यायालयीन व प्रशासकीय स्तरांवर प्रकरणे दाखल झाली होती. व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, विजयकुमार हरिकिशन तापडे यांनी दाखल केलेल्या दिवाणी दाव्यात बाजार समितीने संबंधित भूखंड वाटप मान्य केले होते. तसेच तत्कालीन पणनमंत्री यांनी ९ मे २००३ रोजी अपील मंजूर करून ठराव क्रमांक १२ कायम ठेवला होता. त्यानंतर या निर्णयाला आव्हान देणाऱ्या पुनर्विचार याचिका आणि उच्च न्यायालयातील रिट याचिकाही फेटाळण्यात आल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, बाजार समितीने ३१ मार्च २०१७ रोजी ठराव क्रमांक ३ द्वारे २००२ मधील भूखंड वाटपाचा ठराव रद्द करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, या निर्णयाविरोधात व्यापाऱ्यांनी दाद मागितल्यानंतर पणन संचालकांनी संबंधित ठराव रद्द केला. त्याविरोधात बाजार समितीने पणनमंत्र्यांकडे केलेले अपीलही फेटाळण्यात आले. तसेच यासंदर्भातील उच्च न्यायालयातील याचिकाही फेटाळण्यात आल्याचा दावा व्यापाऱ्यांनी केला आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई ही काही व्यापाऱ्यांबाबत वेगळी आणि आमच्या बाबतीत वेगळी भूमिका घेत असल्याचे व्यापाऱ्यांनी राजकिशोर मोदी यांना सांगितले. दरम्यान व्यापाऱ्यांच्या या मागण्यांविषयी शासनस्तरावर आपण पाठपुरावा करून लवकरच व्यापाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यापाऱ्यांना अश्वसित केले.

# बीडच्या शेत-पाणंद रस्त्यांना मिळणार गती डॉ. योगेश क्षीरसागर यांची सह-अध्यक्षपदी नियुक्ती

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश**

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदारसंघातील शेत-पाणंद रस्त्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपाचे विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांची मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या विधानसभा क्षेत्रस्-तरीय समितीच्या सह-अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देणे, शेतमालाची वाहतूक सुलभ करणे आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शेतरस्त्यांचे प्रश्न सोडविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील ९१



विधानसभा मतदारसं घांमध्ये यापूर्वी १५ जुलै २०२६ रोजी समितीच्या सह-अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली होती. उर्वरित २५ मतदारसंघांतील कामकाजाला गती देण्यासाठी नव्याने नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून, बीडमधून डॉ. योगेश क्षीरसागर यांची निवड झाली आहे.

या समितीच्या माध्यमातून गावोगावी शेत-पाणंद रस्त्यांच्या अडचणी, शेतकऱ्यांच्या तक्रारी आणि रखडलेल्या कामांचा आढावा घेऊन त्यांचा प्रशासनाकडे पाठपुरावा केला जाणार आहे. नियुक्त प्रतिनिधींचा समित्यांमध्ये तातडीने समावेश करून कामकाज सुरू करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

**मुख्यमंत्री, महसूलमंत्री आणि पंकजाताईंचे मानले आभार**

बीड विधानसभा मतदारसंघातील शेत-पाणंद रस्त्यांच्या रखडलेल्या कामांना गती देण्यासाठी प्रशासनाच्या समन्वयातून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही नवनियुक्त सह-अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली. या नियुक्तीबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेत्या तथा मंत्री पंकजाताई मुंडे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले.

# २२ वर्षांनंतर शाळेच्या आठवणींना उजाळा.! अनंत तुळजाराम नाईक विद्यालयाच्या २००३-०४ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

नळेगाव प्रतिनिधी

अनंत तुळजाराम नाईक विद्यालय, नळेगाव येथील सन २००३-०४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला. तब्बल २२ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत मैत्रीचा गोडवा पुन्हा अनुभवला. या मेळाव्याला माजी विद्यार्थ्यांसह आदरणीय गुरुजनांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने मान्यवर गुरुजनांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी शाळेत विद्यार्थ्यांना घडविण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या १३ शिक्षकांचा तसेच ६ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान



करण्यात आला. सत्कारमूर्ती शिक्षकांमध्ये श्री.काळे सर, श्री. आग्रे सर, श्री.येरोळे सर, श्री. बोळेगावे सर, श्री.रेड्डी सर, श्री. रोडगे सर, श्री.सगर सर, श्री.कबाडे सर, श्री.बिरादार सर, श्री.जोशी सर, श्री.पतंगे सर, श्री.वाघमारे सर आणि श्री.शिरूरे सर यांचा समावेश होता.

तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री.हेरकर सोमनाथ काका, श्री.सूर्यवंशी नंदकुमार काका, श्री.कांबळे बाबू काका, श्रीमती मोरखांडे विमल काकी, श्रीमती शृंगारे बेबी काकी आणि श्रीमती होंदारणे शालिनी काकी यांचाही सन्मान करण्यात आला. सर्वांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, नॅपकिनगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

**मनोगतातून जाग्या झाल्या जुन्या आठवणी**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रदीप नागुरे यांनी केले. यावेळी श्री. येरोळे सर, श्री. रेड्डी सर, श्री. कबाडे सर आणि श्री. जोशी सर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व आशीर्वाद दिले. यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी, वर्गातील गमतीजमती, मित्रांसोबत घालवलेले आनंदाचे क्षण आणि शिक्षकांनी केलेले संस्कार यांना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट झाल्याने उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. काही क्षण भावूक करणारेही ठरले.

**स्नेहभोजनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली**

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सर्वांनी महाराष्ट्रीयन व गुजराती पद्धतीच्या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गौतम गायकवाड यांनी केले, तर श्री. अमोल पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. २२ वर्षांनंतर झालेली ही भेट केवळ स्नेहमेळावा न राहता शाळा, शिक्षक, मैत्री आणि संस्कार यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा अविस्मरणीय सोहळा ठरला.

# पारधी बांधवांच्या उन्नतीसाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची ग्वाही

धाराशिव (प्रतिनिधी)

पारधी बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन त्यांच्या पाठीशी आहे. युवकांसाठी कौशल्य विकास व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, तसेच मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यावर भर दिला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सांगितले.

क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे, नगरसेवक वंदना बापू पवार,



बापू पवार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे, शिक्षण विस्तार अधिकारी भागवत आंधळकर, आदिवासी निरीक्षक काशिनाथ राख आणि सामाजिक कार्यकर्ते पंडित भोसले उपस्थित होते.

दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबलीकरण योजनेंतर्गत पाच लाभार्थ्यांना जमिनीचे हस्तांतरण करण्यात आले. तसेच २०११ पूर्वी वनजमिनीवर केलेल्या अतिक्रमणाच्या जमिनी नावावर करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले. पारधी बांधवांना शिक्षण, आरोग्य, रोजगार व उपजीविकेच्या योजनांचा लाभ देण्यावर भर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी जिल्हा परिषदेमार्फत पारधी बांधवांना घरकुल योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.कार्यक्रमात भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते रेशन कार्ड, जात व रहिवासी प्रमाणपत्रांसह विविध प्रमाणपत्रांचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. प्रास्ताविक धनंजय झाकर्डे, सूत्रसंचालन सतीश गायकवाड, तर आभार शकुंतला चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास पारधी बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी



लातूर प्रतिनिधी :

महात्मा बसवेश्वर महाविद्याल यातील जयंती उत्सव समिती आणि कार्यालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, आदिनाथ मुसळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी सहसचिव सुनील मिटकरी, सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे यांनी मानले.

# पदवीधर मतदार संघाचे नवनिर्वाचित आ. डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा प्रा. सनी वाघमारे यांच्याकडून सत्कार



बीड प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून विजय संपादन केल्याबद्दल नवनिर्वाचित आमदार आदरणीय डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा प्रा. सनी विष्णू वाघमारे यांच्याकडून सस्नेह सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी प्रा. सनी वाघमारे यांनी डॉ. प्रतापसिंह पाटील यांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. पदवीधरांचे प्रश्न, शिक्षण क्षेत्रातील समस्या तसेच मराठवाड्याच्या विकासासाठी त्यांच्या माध्यमातून सकारात्मक कार्य घडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या निवडणुकीमध्ये प्रा. सनी विष्णू वाघमारे यांनी

बीड विधानसभेचे आमदार संदीप भैया शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार केले. या सत्कारप्रसंगी ड्रीम फिटनेसचे ओम बोराडे, अमोल भंडारी, मुकुंद राजे भोसले तसेच कृषी पदवीधर युवा शक्ती संघटना, महाराष्ट्र राज्याचे संस्थापक कार्याध्यक्ष प्रवीण आजबे, मनोज दुधाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

# बीड जिल्ह्यातील ऊस तोड मजुरांच्या घामाला प्रशासनाची केराची टोपली

## कामगार नोंदणीचा उडाला फज्जा, भारतीय जनता मजदुर संघ जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार - चंद्रकांत पाटील

केज/प्रतिनिधी

खासगी कंपनीचा भोंगळ कारभार आणि प्रशासनाच्या सुस्तपणा मुळे बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या नोंदणी प्रक्रियेचा पुरता फज्जा उडाला आहे. पूर्वी ग्रामसेवकांमार्फत अत्यंत सुलभतेने होणारी ही नोंदणी यंदा खासगी कंपनीकडे दिल्याने हजारो मजुरांची मोठी ससेहोलपट सुरू आहे.

गावनिहाय नोंदणी कॅम्प आयोजित न केल्याने प्रत्येक गावात ५० ते १०० मजूर नोंदणीपासून वंचित राहिले असल्याचा आरोप भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी केला आहे.

**किचकट अटींमुळे मजूर वेठीस**

मजुरांमधील अज्ञान आणि कागदपत्रांच्या जाचक अटींमुळे नोंदणी प्रक्रिया रखडली आहे.नोंदणी साठी तीन वर्षांचा अनुभव,साखर कारखान्याचे प्रमाणपत्र, ग्रामसेवकांचा दाखला, आधार लिंक आणि बँक खात्याची सक्ती करण्यात आली आहे. पुरेशा



कागदपत्रांच्या अभावी हजारो मजुरांचे अर्ज प्रलंबित पडले आहेत.प्रशासना कडून गावपातळीवर कोणतीही जनजागृती किंवा मार्गदर्शन केले जात नसल्याने मजुरांची फरफट होत आहे.हक्काच्या योजनांपासून वंचित राहण्याची भीती लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाअंतर्गत नोंदणीकृत मजुरांना विशेष स्मार्ट ओळखपत्र,मोफत वैद्यकीय सुविधा, अपघात विमा आणि मुलांसाठी वसतिगृह यांसारख्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळतो. मात्र, चालू गळीत हंगाम संपत आला तरी अद्याप गावपातळीवर शिबिरे घेण्यात आ-लेली नाहीत.

यामुळे जिल्ह्यातील लाखो मजूर आपल्या हक्काच्या योजनां पासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

**प्रशासनाला विचारला जाब**

या ढिसाळ कारभारा बाबत संघटनेने प्रशासनाकडे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. बीड जिल्ह्यात तालुका निहाय नेमक्या किती कामगारांची नोंदणी झाली आणि किती अर्ज मंजूर, नामंजूर व प्रलंबित आहेत? खासगी कंपनीला नोंदणीचे कंत्राट देताना कोणत्या अटी घालण्यात आल्या आहेत? किचकट कागदपत्रां मुळे नेमके किती मजूर नोंदणीपासून वंचित राहिले? प्रशासनाने गावपातळी वर जनजागृती का केली नाही?

**जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार**

या गंभीर प्रश्नांची दखल घेऊन नोंदणी प्रक्रिया तातडीने सुलभ करावी आणि गाव निहाय कॅम्प आयोजित करावेत,या मागणीसाठी भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके आणि महाराष्ट्र सचिव धनंजय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे.

# चिंचोली माळी येथे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवलेल्या १५ गोवंशीय जनावरांची सुटका

## केज पोलिसांची पहाटे साडेचार वाजता कारवाई; ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील पाझर तलावाच्या पडीक जागेवर कत्तल करण्याच्या उद्देशाने विक्रीसाठी बांधून ठेवलेल्या १२ बैल आणि ३ गायी अशा एकूण १५ गोवंशीय जनावरांची केज पोलिसांनी सुटका केली.दि.१३ नोव्हेंबर रोजी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास केलेल्या या कारवाईत पोलिसांनी ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला असून,सर्व जनावरांची गोशाळेत रवानगी करण्यात आली आहे.याबाबत मिळालेल्या माहिती नुसार,चिंचोली माळी येथील पाझर तलावाच्या पडीक जागेवर गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याची माहिती केज पोलीस



ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर,पोलीस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार आणि पोलीस कर्मचारी नितीन वारे यांना सोबत घेऊन पहाटे साडेचार वाजता घटनास्थळी धाव घेतली.पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता १२ बैल आणि ३ गायी अशी एकूण १५ गोवंशीय जनावरे बांधून ठेवल्याचे आढळून आले.पोलिसांनी तत्काळ या जनावरांची सुटका करून तीन लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. त्यानंतर सर्व जनावरांची गोशाळेत व्यवस्था करण्यात आली. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल राहुल तरकसे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७१०/२०२६ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी बजरंग मुंडे करीत आहेत.गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने त्यांना बेकायदेशीर रित्या डांबून ठेवल्या प्रकरणी संबंधित आरोपींचा शोध घेऊन त्यांना लवकरच ताब्यात घेतले जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

केज पोलिसांच्या या कारवाईमुळे कत्तली साठी बांधून ठेवलेल्या १५ गोवंशीय जनावरांना जीवदान मिळाले आहे.




बीड : शहरातील रामतीर्थ परिसरात आद्यक्रांतिगुरू क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त भाजपा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यास तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, माजी उपनगराध्यक्ष अमृत सारडा, गोरख मोमीन, फामजी पारीख, विशाल मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )
विविध वृत्त
रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२६
Sunday, Dt. 15 November 2026
पान -४
PAGE - 4

# दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी शासन कटिबद्ध - पालकमंत्री संजय शिरसाट

## फुलंब्री येथे गरजू कुटुंबांना दिवाळी शिधा वाटप, नदीतील गाळ काढण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा

छत्रपती संभाजीनगर,(जिमाका)

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. दुष्काळाच्या काळात एकाही गरजू कुटुंबाला मदतीपासून वंचित ठेवणार नाही. संभाव्य पाणीटंचाई आणि चाराटंचाईचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज फुलंब्री येथे दिली.

फुलंब्री नगरपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते शहर व तालुक्यातील गरजू कुटुंबे, विधवा महिला तसेच दिव्यांग नागरिकांना दिवाळी शिधासंचांचे वाटप करण्यात आले. नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, उपनगराध्यक्ष जमीर पठाण, जि. प. सदस्य राधाकिसन पठाडे, मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे, तहसीलदार श्रीमती योगिता खटावकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, यंदा दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी आणि शेतमजुरांसमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. सध्या पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध असला तरी आगामी फेब्रुवारी व मार्च महिन्यांत टंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य परिस्थितीचा विचार करून आतापासूनच नियोजन करणे



आवश्यक आहे. नागरिकांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

दुष्काळग्रस्त कुटुंबांना दिवाळीच्या काळात दिलासा मिळावा, यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून राज्यभरात पाच लाख दिवाळी शिधा संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम असून आगामी काळातही आवश्यकतेनुसार मदतकार्य सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

**नदीतील गाळ काढण्यासाठी ५० लाखांची मदत**

फुलंब्री शहरातील नदीपात्रातील गाळ काढण्याच्या कामासाठी तातडीची मदत म्हणून ५० लाख रुपये उपलब्ध करून देण्यात येतील, अशी घोषणा पालकमंत्री शिरसाट यांनी यावेळी केली. तसेच २५ नोव्हेंबरपासून गाळ काढण्याचे काम सुरू करण्याचे निर्देश त्यांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले.

नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांनी नदीपात्रातील गाळ काढण्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच स्थानिक विकास निधीतून आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याची विनंती केली. नदीतील गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

चंद्रकांत जाधव यांनी प्रास्ताविक केले. नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे आणि रमेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले. अभिजित घोडके यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

यावेळी माजी महापौर त्रिंबक तुपे, नंदकुमार घोडले, अश्फाक पटेल, अजगर पटेल, रमेश पवार, चंद्रकांत जाधव यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, नगरसेवक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मलाबार ग्रुपच्या ३४ व्या स्थापना दिनानिमित्त पुण्यात विविध ठिकाणी स्वच्छता अभियानाचे आयोजन

पुणे / प्रतिनिधी : मलाबार ग्रुपच्या ३४ व्या स्थापना दिनानिमित्त देशभरात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता अभियानांतर्गत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या पिंपरी-चिंचवड आणि विमाननगर शोरूमच्या वतीने पिंपरी येथील एच. ए. ग्राउंड आणि येरवडा येथील तारकेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिका व नगरपालिका यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्वच्छता मोहिमेत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या व्यवस्थापनातील अधिकारी, शोरूम प्रमुख, कर्मचारी तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्वांनी एकत्रितपणे स्वच्छता उपक्रमात योगदान देत परिसर स्वच्छ करण्यासाठी पुढाकार घेतला.

पर्यावरण, सामाजिक बांधिलकी आणि सुशासन (ESG) या तत्त्वांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मलाबार ग्रुपच्या वतीने या महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील मलाबार ग्रुपच्या ९,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता अभियानात



सहभाग घेतला.

यावेळी मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद म्हणाले, ''पर्यावरणाप्रती जबाबदारी, सामाजिक बांधिलकी, पारदर्शकता आणि नैतिक व्यावसायिक प्रशासन या मूल्यांचा व्यावसायिक कार्यपद्धतीत समावेश करून तत्त्वांना अधिक बळकटी देण्यासाठी कंपनी कटिबद्ध आहे. पर्यावरणीय शाश्वततेच्या उपक्रमांचा एक भाग म्हणून येत्या वर्षभरात देशभरात सुमारे १ लाख वृक्षांची लागवड करण्याचे ग्रुपचे उद्दिष्ट आहे.'' व्यावसायिक कार्यासोबतच मलाबार ग्रुप समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विविध घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सातत्याने प्रभावी सामाजिक उपक्रम राबवत आहे. यामध्ये 'हंगर फ्री वर्ल्ड' हा भूकमुक्ती उपक्रम, वंचित मुलांसाठी मायक्रो लर्निंग सेंटर्स, मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना तसेच ज्येष्ठ महिलांसाठी 'ग्रँडमा होम्स' यांसारख्या महत्त्वपूर्ण उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांमधून सामाजिक उत्तरदायित्व आणि शाश्वत विकासाप्रती मलाबार ग्रुपची असलेली बांधिलकी स्पष्ट होते.

**मलाबार गोल्ड अँड डायमंड्सविषयी**

मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची स्थापना १९९३ मध्ये झाली असून, ही कंपनी मलाबार ग्रुपची प्रमुख कंपनी आहे. मलाबार ग्रुप हा भारतातील अग्रगण्य आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेला व्यावसायिक समूह आहे. ९.४१ अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या वार्षिक उलाढालीसह मलाबार गोल्ड अँड डायमंड्स ही जागतिक स्तरावरील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी ज्वेलरी रिटेल कंपनी आहे. कंपनीचे १४ देशांमध्ये ४५० हून अधिक शोरूम्सचे विस्तृत रिटेल नेटवर्क आहे.

भारत, मध्य पूर्व, दक्षिण पूर्व आणि पूर्व आशिया, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथे कंपनीची कार्यालये, डिझाइन सेंटर्स, घाऊक विक्री केंद्रे तसेच उत्पादन सुविधा कार्यरत आहेत.

३,५०० हून अधिक भागधारकांच्या मालकीच्या या ग्रुपमध्ये २६ हून अधिक देशांतील ३०,००० पेक्षा जास्त व्यावसायिक कार्यरत असून, त्यांच्या योगदानातून ग्रुपच्या सातत्यपूर्ण विकासाला आणि प्रगतीला चालना मिळत आहे.

# घरातून निघून गेलेली अल्पवयीन मुलगी १४ तासांच्या सुखरूप मिळाली



बीड प्रतिनिधी : वडिलांनी रागावल्याच्या कारणावरून घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेलेल्या दहा वर्षीय अल्पवयीन मुलीचा शिवाजीनगर पोलिसांनी अवघ्या १४ तासांत शोध घेऊन तिला सुखरूप तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले.

दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सदर मुलगी घरातून निघून गेल्याची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली. शहरातील विविध भागांतील १०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. तसेच विविध ठिकाणी शोध घेण्यात आला. अखेर रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास छत्रपती क्रीडा संकुल परिसरातील एका झोपडीजवळ सदर मुलगी सुखरूप आढळून आली. पोलिसांच्या तत्परतेने आणि नियोजनबद्ध शोधमोहिमेमुळे मुलगी सुखरूप मिळाल्याने कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले. ही शोध मोहीम पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सतीश पंडित, पोलीस उपनिरीक्षक श्री. माधव काटकर, पोलीस उपनिरीक्षक श्री. ज्ञानेश्वर धोत्रे, पोलीस अंमलदार सूरज वाघमारे व अफताब शेख यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# ३ ते ६ डिसेंबर दरम्यान ठाणे 'शहापूर कार्निव्हल २०२६' चा दिमाखदार सोहळा

शहापूर प्रतिनिधी

शहापूरमध्ये 'माझा महोत्सव... शहापूर महोत्सव...' या संकल्पनेवर आधारित 'शहापूर कार्निव्हल २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य महोत्सव आगामी ३ डिसेंबर ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत शिवसागर पेट्रोलपंपासमोरल मैदान, परांजपेनगर, चेरपोली, शहापूर येथे पार पडणार आहे. या चार दिवसीय महोत्सवात विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि मनोरंजक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

**महोत्सवाचे चार दिवसीय मुख्य आकर्षण:**

**दिवस पहिला (३ डिसेंबर २०२६ – गुरुवार):**

सायंकाळी ६.०० वा.: गुरुवर्य पुंडलिकजी महाराज, संतोषनाथजी महाराज आणि तुषार महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य उद्घाटन सोहळा संपन्न होईल.

सायंकाळी ७.०० वा.: शहापूर




तालुक्यातील हरिपाठ मंडळांचा सहभाग असलेला 'हरिनामाचा गजर' हा भव्य सोहळा होईल. रात्री ८.०० वा.: शहापूर तालुका मर्यादित 'तालुकास्तरीय शालेय नृत्य स्पर्धा' आयोजित केली आहे.

**दिवस दुसरा (४ डिसेंबर २०२६ – शुक्रवार):**

सायंकाळी ६.०० वा.: शहापूर तालुक्यातील विविध क्षेत्रांतील (शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, कला, क्रीडा, उद्योग, कृषी, पर्यावरण इ.) उल्लेखनीय कार्यासाठी 'शहापूर वैभव सन्मान सोहळा २०२६' पार पडेल. याप्रसंगी ठाणे जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतील. तसेच साई नृत्यांगणा कलामंच (मुंबई) निर्मित आणि साई बनसोडे दिग्दर्शित 'हि शान महाराष्ट्राची' या मराठी लोकपरंपरेच्या नृत्याविष्काराचे विशेष सादरीकरण होईल.

**दिवस तिसरा (५ डिसेंबर २०२६ – शनिवार – महिला विशेष दिन):**

प्रसिद्ध अभिनेत्री सौ. दिपाली सैयद भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला विशेष दिन साजरा केला जाईल तसेच सायंकाळी ५.०० वा.: मेकअप आर्टिस्ट अपर्णा लोणे यांच्या संयोजनाखाली 'जिल्हास्तरीय साज नख्वारीचा मेकअप स्पर्धा' होईल तसेच सायंकाळी ६.०० वा.: सेलिब्रिटी गेस्ट मेकअप आर्टिस्ट संजना पंडित यांच्या उपस्थितीत 'साज नख्वारीचा रॅम्प वॉल्क' पार पडेल तसेच रात्री ८.०० वा.: कॉमेडीयन अँकर निलेश पापत यांच्या सूत्रसंचालनाखाली 'होम मिनिस्टर – मिस्टर आणि मिसेस शहापूर' हा मनोरंजक खेळ व कार्यक्रम रंगणार आहे. **दिवस चौथा (६ डिसेंबर २०२६ – रविवार):**

रात्री ८.०० वा.: 'द फोक मराठी' या कार्यक्रमांतर्गत १०० कलाकार एकाच मंचावर महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा विविध रंगांचा अविष्कार सादर करतील तसेच शहापूरकरांसाठी हा महोत्सव कला, संस्कृती आणि मनोरंजनाची एक पर्वणी ठरणार असून, नागरिकांनी येणाऱ्या नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने करावी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# रणवीर काका पंडित यांच्याकडे जातेगाव शाळेसाठी वर्गखोल्यांची मागणी



जातेगाव प्रतिनिधी : जातेगाव ता गेवराई येथील जिल्हा परिषद शाळेसाठी आवश्यक असलेल्या नवीन वर्गखोल्यांच्या मागणीसंदर्भात युवा नेते मा. श्री. रणवीर काका पंडित यांची भेट घेण्यात आली. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी व शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने वर्गखोल्यांची मागणी करण्यात आली. या मागणीचा नक्कीच सकारात्मक विचार केला जाईल, असा विश्वास रणवीर काका पंडित यांनी यावेळी व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण मागणीसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर चव्हाण, विशाल पांढरे,राधेश्याम लेंडाळ,विशाल आरबड, रुद्रा घोलप उपस्थित होते. आपल्या गावातील शाळा अधिक सक्षम व्हावी, विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात आणि शिक्षणाचा दर्जा उंचावावा, हाच या प्रयत्नामागील प्रामाणिक हेतू आहे. आपल्या शाळेसाठी एकजुटीने प्रयत्न करूया असा विश्वास पदाधिकारी यांनी दिला आहे.

# पंढरपूर दिंडीच्या स्नेह भोजन सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा रमेशराव आडसकर यांच्या हस्ते सत्कार

## शिवदास तात्या थळकरी यांचा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा स्तुत्य उपक्रम

केज/प्रतिनिधी

औरंगपुर पावन धाम येथील महंत ह.भ.प. श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर कडे पायी जाणारी दिंडी दरवर्षीप्रमाणे सोनीजवळा येथील शिवदास तात्या थळकरी यांच्या निवासस्थानी स्नेह भोजनासाठी थांबली होती.

यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी कु. भाग्यश्री गोविंद



ससाणे (MBBS), कु. मंजिरी वैजनाथ थळकरी (MBBS), शिवशंकर रामेश्वर थळकरी (MBBS) या वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच कु.स्नेहा श्रीकृष्ण थळकरी (महसूल सहाय्यक) यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे केज तालुकाध्यक्ष शिवदास तात्या थळकरी, उमाकांत अण्णा डोंगरे, वैजनाथ थळकरी, कैलास पाटील, सुहास गुजर, शंकर इंगळे, शिवहार थळकरी, उपसरपंच हनुमंत पाटील, शहाजी शिंदे, महेश थळकरी, ॲड.हनुमान जाधव, जनक राऊत, दत्ता देशमाने, अविनाश ससाणे, मनोज कदम, सोनीजवळा ग्राम पंचायत सरपंच पती गोविंद ससाने, मिनाज पठाण, सचिन मुळे, अजय काळे यांच्यासह दिंडीतील वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षणाच्या माध्यमा तून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन करावे, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या यशाचा समाजासमोर गौरव व्हावा, या उद्देशाने शिवदास तात्या थळकरी हे दरवर्षी दिंडीच्या स्नेह भोजनाच्या निमित्ताने अशा उपक्रमाचे आयोजन करतात.

त्यांचा हा उपक्रम निश्चितच विद्यार्थ्यां साठी प्रेरणादायी आणि कौतुकास्पद असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# जिल्हा परिषद शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थ एकवटले लोकसहभागातून मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार

मानूर प्रतिनिधी

गावाचा खरा विकास शिक्षणातून होतो आणि गावातील शाळा ही पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्याचा पाया असते, ही जाणीव ठेवून शिरूर कासार तालुक्यातील नांदेवाली ग्रामस्थांनी दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर शिक्षण विकासाचा महत्त्वपूर्ण संकल्प केला. गावातील जिल्हा परिषद शाळेचा सर्वांगीण विकास करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासह आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामस्थांनी एकजुटीने पुढाकार घेतला आहे. यानिमित्त शाळेत आयोजित बैठकीत सरपंच, माजी सरपंच, माजी उपसरपंच, आजी-माजी पदाधिकारी, उद्योजक, नोकरदार, शेतकरी, तरुण, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिवाळी पाडवा हा नवीन संकल्प आणि शुभारंभाचा दिवस मानला जातो. याच दिवसाचे औचित्य साधून गावाच्या विकासातील सर्वांत महत्त्वाच्या घटकाकडे म्हणजेच शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या, तर त्यांचा शैक्षणिक विकास अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकतो. त्यामुळे शासनाच्या निधीची वाट न पाहता लोकसहभागातून शाळेच्या गरजा पूर्ण करण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली.

या बैठकीस सरपंच अंकुश शेळके, पत्रकार चंद्रकांत राजहंस माजी सरपंच ओमप्रकाश जोजारे, माजी उपसरपंच चंद्रकांत थिटे, चेअरमन सोपान शेळके,उद्योजक श्रीनिवास उगले, यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी, उद्योजक, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. शाळेच्या सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

शाळेच्या इमारतीची आवश्यक दुरुस्ती, वर्गखोल्यांची सुधारणा, स्वच्छतागृहांची सुविधा, शुद्ध पिण्याचे पाणी, वीज व्यवस्था, वर्गखोल्यांमध्ये पंखे, विद्यार्थ्यांसाठी पुरेशी बैठक व्यवस्था, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय, संगणक सुविधा, खेळाचे साहित्य आणि शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर करण्यास प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता त्यांचा बौद्धिक, शारीरिक आणि व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यावरही भर देण्यात आला.

शाळेच्या विकासासाठी गावातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. गावातील उद्योजक, नोकरदार, शेतकरी, व्यावसायिक, तरुण आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी आपल्या क्षमतेनुसार आर्थिक अथवा वस्तुरूपाने योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. प्रत्येक कुटुंबाने आपल्या गावातील शाळेला आपली शाळा समजून हातभार लावला, तर मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लागू शकतात, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. सध्या अनेक पालक आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी खासगी शाळांना प्राधान्य देत आहेत. मात्र, गावातील जिल्हा परिषद शाळेतही दर्जेदार शिक्षण, आवश्यक सुविधा आणि आनंददायी वातावरण उपलब्ध झाले, तर पालकांचा सरकारी शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. गावातीलच मुलांना गावात चांगले शिक्षण मिळावे, आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याला शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने नांदेवाली करांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

बैठकीच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक अशोक खताळ आणि शिक्षक गजानन थिटे यांनी उपस्थित ग्रामस्थांचे आदरपूर्वक स्वागत केले. ग्रामस्थांच्या या पुढाकारामुळे शाळेच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).